M3/PR/07/2025

Mumbai Among First Indian Cities to Link EV Battery Swapping with Metro & Monorail Network 03/06/2025

Mumbai, 3rd June 2025 – As the world prepares to celebrate Environment Day, we are proud to contribute to society with a transformative step towards sustainable mobility and green public transport. The Maha Mumbai Metro Operation Corporation Ltd. (MMMOCL) has partnered with Honda Power Pack Energy India Pvt. Ltd., a subsidiary of Japan's Honda Motor Co. Ltd., to install E:swap battery swapping stations across Mumbai's extensive metro and monorail network.

Under this green initiative, 25 Metro stations and 6 Monorail stations will be equipped with Honda's advanced battery swapping technology, making Mumbai one of the first metropolitan cities in India to integrate EV battery infrastructure with its mass transit ecosystem.

This collaboration is the first major rollout under MMMOCL's Electric Vehicle (EV) Policy, which promotes clean energy solutions and smart last-mile connectivity. The policy was approved under the chairmanship of Dr. Sanjay Mukherjee, IAS, Commissioner of MMRDA and Chairman of Maha Mumbai Metro, in the 29th Board Meeting of MMMOCL. Honda has committed to deploying its E:swap system, which allows electric two- and three-wheeler users to exchange their depleted Honda Mobile Power Pack e: battery for a fully charged one in under two minutes.

E:swap Battery Swapping Stations Will Be Installed at the Following Locations:

1) Metro Line 7 (Red Line):

Gundavali, Mogra, Jogeshwari East, Goregaon East, Aarey, Dindoshi, Kurar, Akurli, Poisar, Devipada, Rashtriya Udyan

2) Metro Line 2A (Yellow Line):

Dahisar East, Anand Nagar, Kandarpada, Eksar, Borivali West, Shimpoli, Kandivali West, Dahanukarwadi, Malad West, Lower Malad, Bangur Nagar, Oshiwara, Lower Oshiwara, Andheri West

3) Monorail Stations:

Sant Gadge Maharaj Chowk, Mint Colony, Naigaon, Wadala, Fertilizer Township, Chembur

All installations will adhere to strict safety, technical, and environmental standards, ensuring smooth access and high usability for daily EV users, including delivery agents and fleet operators.

The Honda E:swap initiative is not only environmentally sustainable but also economically beneficial—offering MMMOCL an estimated non-fare box revenue (NFBR) of ₹30 lakh, thereby contributing to financial self-reliance while promoting green mobility.

Hon’ble Chief Minister of Maharashtra, Shri Devendra Fadnavis, said, "Our government is committed to accelerating electric mobility across Maharashtra. Battery swapping stations at metro and monorail nodes will support delivery personnel, daily riders, and fleet operators in making the EV shift. This initiative is a perfect example of how smart infrastructure and green technology can come together for public benefit."

Hon’ble Deputy Chief Minister of Maharashtra, Shri Eknath Shinde, said, "Green infrastructure is not a luxury—it is a necessity for the future of Maharashtra. Through initiatives like battery swapping at metro stations, we are building an integrated and climate-resilient mobility system that puts citizens and the environment first. I congratulate MMMOCL and Honda for taking this important step in advancing our state’s EV mission."

Dr. Sanjay Mukherjee, IAS, Metropolitan Commissioner, MMRDA & Chairman, MMMOCL, said, "This collaboration with Honda marks a significant stride in our mission to create a sustainable, low-emission urban ecosystem. By enabling quick and convenient battery swapping at metro and monorail locations, we are laying the foundation for future-ready transport. I’m pleased to share that the first E:swap centre is already installed at Dahisar East Metro Station, and we are rapidly expanding this network across 30 more locations in the city.

Ms. Rubal Agrawal, IAS, Managing Director, MMMOCL, commented, "Our vision is to integrate sustainable technology seamlessly into public transport. With the Honda E:swap initiative and the backing of our EV Policy, we are empowering EV users with smarter infrastructure while supporting Maharashtra’s clean energy and climate goals."

What is Honda E:swap?

Honda’s E:swap is a next-generation battery swapping platform for electric two- and three-wheelers, allowing users to replace a depleted battery with a fully charged Honda Mobile Power Pack e: in under two minutes. This system solves key issues like long charging times and range anxiety—making EV adoption practical for delivery personnel, daily commuters, and fleet operators in Mumbai’s dense urban environment.

Under the EV Policy, various private players can participate in this environment-friendly initiative to install such battery swapping centres along Metro Lines 2A and 7.

For more details, visit: www.mmmocl.co.in

Marathi :-

मेट्रो व मोनो रेल्वेच्या एकूण ३१ स्थानकांलगत ई:स्वॅप बॅटरी स्टेशन्स सुरू करण्यासाठी महामुंबई मेट्रोची भागीदारी; मुंबई शहर ईव्हीसाठी अनुकूल करण्यासाठी आणि हरित भविष्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल

मेट्रो व मोनोरेल मार्गिकांना ईव्ही बॅटरी स्वॅपिंगशी जोडणाऱ्या पहिल्यावहिल्या काही शहरांमध्ये मुंबईचा समावेश करण्यासाठी ही भागीदारी महत्त्वाची

मुंबई, ३ जून २०२५ :

जागतिक पर्यावरण दिनासाठी सगळे जग सज्ज होत असताना पर्यावरणस्नेही वाहतूक व हरित सार्वजनिक परिवहन सेवा अधिक चांगल्या करण्यात योगदान दिल्याचे आम्ही अभिमानाने सांगू शकतो. मुंबईभर पसरलेल्या मेट्रो व मोनोरेलच्या स्थानकांवर ईःस्वॅप बॅटरी स्वॅपिंग स्टेशन्स सुरू करण्यासाठी महामुंबई मेट्रो ऑपरेशन्स कॉर्पोरेशन लि.ने (एमएमएमओसीएल) जपानच्या होंडा मोटर कंपनी लिमिटेडची उप कंपनी असलेल्या होंडा पॉवर पॅक एनर्जी इंडिया प्रा. लि.शी भागीदारी केली आहे.

या हरित उपक्रमांतर्गत २५ मेट्रो स्थानके व ६ मोनो रेल स्थानकांच्या ठिकाणी होंडाचे हे अॅडव्हान्स्ड बॅटरी स्वॅपिंग तंत्रज्ञान बसविण्यात येईल. त्यामुळे, मुंबई हे सार्वजनिक परिवहन सेवेशी ईव्ही बॅटरी पायाभूत सुविधा जोडणारे भारतातील अग्रगण्य शहर ठरणार आहे.

एमएमएमओसीएलच्या इलेक्ट्रिक वाहन धोरणांतर्गत उचलण्यात आलेले हे एक मोठे पाऊल असून, पर्यावरणस्नेही ऊर्जा उपाययोजना आणि स्मार्ट लास्ट-माईल कनेक्टिव्हिटीला चालना देण्यावर या धोरणामध्ये भर देण्यात आला आहे. एमएमआरडीएचे आयुक्त आणि महामुंबई मेट्रोचे अध्यक्ष, डॉ. संजय मुखर्जी (भाप्रसे) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या एमएमएमओसीएलच्या २९व्या संचालक मंडळाच्या बैठकीत हे धोरण मंजूर करण्यात आले. होंडाने त्यांची ई:स्वॅप सिस्टीम बसविण्याचे आश्वासन दिले आहे. या प्रणालीद्वारे इलेक्ट्रिक दुचाकी आणि तीन चाकी वाहनांचे वापरकर्ते त्यांच्या चार्ज संपलेल्या होंडा मोबाइल पॉवर पॅक ई: बॅटरीऐवजी दुसरी पूर्ण चार्ज केलेली बॅटरी केवळ दोन मिनिटांत घेऊ शकतात.

खालील ठिकाणी ई-स्वॅप बॅटरी स्वॅपिंग स्टेशन्स बसविण्यात येतील :

१) मेट्रो ७ मार्गिका (लाल मार्गिका) :

गुंदवली, मोगरा, जोगेश्वरी पूर्व, गोरेगाव पूर्व, आरे, दिंडोशी, कुरार, आकुर्ली, पोईसर, देवी पाडा, राष्ट्रीय उद्यान

२) मेट्रो २ए मार्गिका (पिवळी मार्गिका) :

दहिसर पूर्व, आनंद नगर, कांदरपाडा, एक्सर, बोरिवली पश्चिम, शिंपोली, कांदिवली पश्चिम, डहाणूकरवाडी, मालाड पश्चिम, लोअर मालाड, बांगूर नगर, ओशिवरा, लोअर ओशिवरा, अंधेरी पश्चिम

३) मोनोरेल स्थानके:

संत गाडगे महाराज चौक, मिंट कॉलनी, नायगाव, वडाळा, फर्टिलायझर टाऊनशिप, चेंबूर

सर्व ठिकाणी इन्स्टॉलेशन करताना सुरक्षा, तांत्रिक आणि पर्यावरणासंदर्भातील निकषांचे काटेकोर पालन करण्यात येणार असून दररोज ईव्ही वापरणाऱ्यांसाठी, विशेषतः डिलिव्हरी एजंट्स आणि फ्लीट ऑपरेटर्ससाठी सोपा ॲक्सेस व वापरसुलभतेची खात्री करण्यात येणार आहे.

ई:स्वॅप उपक्रम हा पर्यावरणदृष्ट्या शाश्वत आहेच, त्याचप्रमाणे आर्थिकदृष्ट्याही फायदेशीर आहे. यामुळे एमएमएमओसीएलला तिकीटाव्यतिरिक्त सुमारे ₹३० लाखांचे उत्पन्न मिळणार आहे. परिणामी, एकीकडे आत्मनिर्भरता वाढेल आणि दुसऱ्या बाजूला हरित वाहतुकीला चालना मिळेल.

सन्माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस म्हणाले,

"महाराष्ट्रात इलेक्ट्रिक मोबिलिटीला चालना देण्यास आपले सरकार कटिबद्ध आहे. मेट्रो आणि मोनो रेल्वे स्थानकांजवळ उभारण्यात येणाऱ्या बॅटरी स्वॅपिंग स्टेशन्समुळे डिलिव्हरी कर्मचारी, रोज प्रवास करणारे नागरिक आणि फ्लीट ऑपरेटर यांना ईव्हीकडे वळण्यास मोठी चालना मिळणार आहे. जनहितासाठी स्मार्ट पायाभूत सुविधा आणि हरित तंत्रज्ञानाची कशा प्रकारे सांगड घातली जाऊ शकते, याचे हे उत्तम उदाहरण आहे."

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि एमएमआरडीएचे अध्यक्ष, श्री. एकनाथ शिंदे म्हणाले, "हरित पायाभूत सुविधा ही चैन नाही, तर महाराष्ट्राच्या भविष्यासाठीची गरज आहे. मेट्रो स्थानकांवरील बॅटरी स्वॅपिंगसारख्या उपक्रमांच्या माध्यमातून आपण नागरिक आणि पर्यावरणाला प्राधान्य देणारी एकात्मिक आणि हवामान बदलाच्या आव्हानांशी जुळवून घेत त्यावर मात करणारी वाहतूक व्यवस्था उभारत आहोत. राज्याच्या ईव्ही मिशनला पुढे नेणारे हे महत्त्वाचे पाऊल उचलल्याबद्दल मी एमएमएमओसीएल आणि होंडाचे अभिनंदन करतो."

एमएमआरडीएचे महानगर आयुक्त आणि एमएमएमओसीएलचे अध्यक्ष, डॉ. संजय मुखर्जी (भा.प्र.से.) म्हणाले,

"शाश्वत, कमी उत्सर्जन असलेली नागरी परिसंस्था उभारण्याच्या आमच्या मिशनमध्ये होंडासोबतची ही भागीदारी हे एक मोठे पाऊल आहे. मेट्रो आणि मोनोरेल स्थानकांवर बॅटरी स्वॅपिंगची जलद व सोयीस्कर सुविधा उपलब्ध करून देत आम्ही भविष्यसज्ज वाहतूक व्यवस्थेचा

पाया घालत आहोत. पहिले ई:स्वॅप केंद्र दहिसर पूर्व मेट्रो स्थानकावर कार्यान्वित झाले आहे आणि मुंबईत आणखी ३० ठिकाणी ही सुविधा वेगाने सुरू केली जात आहे, हे सांगताना मला अत्यंत आनंद होत आहे"

एमएमएमओसीएलच्या व्यवस्थापकीय संचालक, रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) म्हणाल्या, "सार्वजनिक परिवहन व्यवस्थेत शाश्वत तंत्रज्ञान अंतर्भूत करणे हे आमचे ध्येय आहे. होंडाच्या ई:स्वॅप उपक्रमामुळे आणि आमच्या ईव्ही धोरणाच्या पाठबळामुळे आपण इलेक्ट्रिक वाहन वापरकर्त्यांना अधिक स्मार्ट पायाभूत सुविधा उपलब्ध करून देत आहोत, तसेच महाराष्ट्राच्या पर्यावरणस्नेही ऊर्जेच्या व हवामानविषयक उद्दिष्टांना बळकटी देत आहोत.

होंडा ई:स्वॅप काय आहे?

होंडाचा ई:स्वॅप हा इलेक्ट्रिक दुचाकी व तीनचाकी वाहनांसाठी नेक्स्ट जनरेशन बॅटरी स्वॅपिंग प्लॅटफॉर्म आहे. या माध्यमातून वापरकर्त्यांना त्यांच्या चार्ज संपलेल्या बॅटरीच्या जागी होंडाची पूर्ण चार्ज केलेली मोबाइल पॉवर पॅक बॅटरी बसवता येते. चार्जिंगसाठी लागणारा वेळ, रेंजविषयी असलेली चिंता या महत्त्वाच्या समस्या या सिस्टीमुळे सोडविल्या जातात. त्यामुळे मुंबईतील दाट लोकवस्ती असलेल्या शहरात डिलिव्हरी करणाऱ्या व्यक्ती, दैनंदिन प्रवासी आणि फ्लीट ऑपरेटर्ससाठी ईव्ही स्विकारणे अधिक व्यावहारिक होते.

ईव्ही धोरणांतर्गत अनेक खासगी कंपन्या मेट्रो २ए व ७ या मार्गिकांशी संलग्न असलेल्या भागांत अशा प्रकारची बॅटरी स्वॅपिंग केंद्रे उभारून या पर्यावरणस्नेही उपक्रमात सहभागी होऊ शकतात.

अधिक माहितीसाठी www.mmmocl.co.in या वेबसाइटला भेट द्यावी.

Hindi :-

मुंबई मेट्रो और मोनोरेल के कुल 31 स्स्टेशनों पर शुरू होंगे ईःस्वॅप बैटरी स्टेशन, मुंबई को ईवी-अनुकूल और हरित भविष्य की ओर ले जाने की दिशा में बड़ा कदम

मेट्रो और मोनोरेल मार्गों को ईवी बैटरी स्वैपिंग से जोड़ने वाले पहले कुछ शहरों में मुंबई को शामिल करने के लिए यह साझेदारी महत्वपूर्ण है।

मुंबई, 3 जून 2025 –

पर्यावरण दिवस की तैयारी के बीच, महा मुंबई मेट्रो ऑपरेशन्स कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमएमओसीएल) ने हरित और पर्यावरण के अनुकूल सार्वजनिक परिवहन की दिशा में बड़ा कदम उठाया है। जापान की होंडा मोटर कंपनी की भारतीय इकाई होंडा पावर पैक एनर्जी इंडिया प्राइवेट लिमिटेड के साथ साझेदारी के तहत मुंबई के मेट्रो और मोनोरेल नेटवर्क पर ईःस्वॅप बैटरी स्वॅपिंग स्टेशन लगाए जाएंगे।

इस हरित पहल के तहत, मुंबई के 25 मेट्रो स्टेशनों और 6 मोनोरेल स्टेशनों पर होंडा की उन्नत बैटरी स्वैपिंग तकनीक लगाई जाएगी। इससे मुंबई उन शुरुआती महानगरीय शहरों में शामिल हो जाएगा, जहां सार्वजनिक परिवहन व्यवस्था को ईवी बैटरी इन्फ्रास्ट्रक्चर से जोड़ा जा रहा है।

यह साझेदारी महा मुंबई मेट्रो ऑपरेशन्स कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमएमओसीएल) की इलेक्ट्रिक व्हीकल (ईवी) नीति के तहत होने वाला पहला बड़ा कदम है, जो स्वच्छ ऊर्जा समाधानों और स्मार्ट लास्ट-माइल कनेक्टिविटी को बढ़ावा देती है। यह नीति डॉ. संजय मुखर्जी, आईएएस, आयुक्त एमएमआरडीए व अध्यक्ष महा मुंबई मेट्रो, की अध्यक्षता में आयोजित एमएमएमओसीएल की 29वीं बोर्ड बैठक में मंजूर की गई थी। होंडा ई:स्वॅप प्रणाली के तहत, इलेक्ट्रिक दोपहिया और तिपहिया वाहन उपयोगकर्ता अपनी खत्म हो चुकी होंडा मोबाइल पावर पैक ई: बैटरी को दो मिनट से भी कम समय में पूरी तरह चार्ज बैटरी से बदल सकेंगे।

निम्नलिखित स्थानों पर मोबाइल पावर पैक ई:स्वॅप बैटरी स्वॅपिंग स्टेशन लगाए जाएंगे :

1)मेट्रो लाईन 7 (रेड लाईन):

गुंडवली, मोगरा, जोगेश्वरी ईस्ट, गोरेगाव ईस्ट, आरे, डिंडोशी, कुरार, आकुर्ली, पोईसर, देविपाडा, राष्ट्रीय उद्यान

2)मेट्रो लाईन 2ए (यलो लाईन):

दहिसर ईस्ट, आनंद नगर, कांदरपाडा, एक्सर, बोरिवली वेस्ट, शिंपोली, कांदिवली वेस्ट, दहानुकरवाड़ी, मालाड वेस्ट, लोअर मालाड, बांगूर नगर, ओशिवरा, लोअर ओशिवरा, अंधेरी वेस्ट

3) मोनोरेल स्थानके:

संत गाडगे महाराज चौक, मिंट कॉलनी, नायगांव, वडाळा, फर्टिलायझर टाउनशिप, चेंबूर

सभी ईःस्वॅप युनिट्स को सख्त सुरक्षा, तकनीकी और पर्यावरणीय मानकों के तहत स्थापित किया जाएगा, जिससे डिलिवरी एजेंटों और फ्लीट ऑपरेटर्स जैसे दैनिक ईव्ही उपयोगकर्ताओं के लिए इनका उपयोग आसान और सुविधाजनक रहेगा।

ईःस्वॅप पहल न केवल पर्यावरण के लिए अनुकूल है, बल्कि आर्थिक रूप से भी लाभकारी साबित होगी–इससे महामुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमएमओसीएल) को अनुमानित ₹30 लाख की नॉन-फेअर बॉक्स रेवेन्यू (एनएफबीआर) प्राप्त हो सकती है, जिससे हरित परिवहन को बढ़ावा मिलने के साथ-साथ आर्थिक आत्मनिर्भरता की दिशा में भी प्रगती होगी।

महाराष्ट्र के माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस ने कहा :

हमारी सरकार पूरे महाराष्ट्र में इलेक्ट्रिक मोबिलिटी को तेज़ी से आगे बढ़ाने के लिए प्रतिबद्ध है। मेट्रो और मोनोरेल स्टेशनों पर बैटरी स्वैपिंग स्टेशनों की सुविधा से डिलीवरी एजेंट्स, रोज़ाना सफर करने वाले यात्रियों और फ्लीट ऑपरेटर्स को ईवी की ओर रुख करने में मदद मिलेगी। यह पहल इस बात का बेहतरीन उदाहरण है कि स्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चर और हरित तकनीक कैसे मिलकर जनहित में काम कर सकते हैं।

माननीय महाराष्ट्र के उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे ने कहा:

"हरित बुनियादी ढांचा कोई विलासिता नहीं, बल्कि महाराष्ट्र के भविष्य की जरूरत है। मेट्रो स्टेशनों पर बैटरी स्वैपिंग जैसी पहलों के ज़रिए हम एक ऐसा एकीकृत और मौसम की चुनौतियों का सामना करने में सक्षम परिवहन तंत्र विकसित कर रहे हैं, जो नागरिकों और पर्यावरण–दोनों को प्राथमिकता देता है। मैं एमएमएमओसीएल और होंडा को राज्य के ईवी मिशन को आगे बढ़ाने की इस महत्वपूर्ण पहल के लिए बधाई देता हूं।"

डॉ. संजय मुखर्जी, आईएएस, महानगर आयुक्त, एमएमआरडीए और अध्यक्ष, एमएमएमओसीएल ने कहा:

"होंडा के साथ यह साझेदारी टिकाऊ और कम-उत्सर्जन वाले शहरी परिवेश की दिशा में हमारे मिशन का एक अहम कदम है। मेट्रो और मोनोरेल स्टेशनों पर तेज और सुविधाजनक बैटरी स्वैपिंग की सुविधा देकर हम भविष्य के लिए तैयार परिवहन प्रणाली की नींव रख रहे हैं। मुझे यह बताते हुए खुशी हो रही है कि पहला ई:स्वॅप केंद्र दहिसर ईस्ट मेट्रो स्टेशन पर स्थापित हो चुका है, और हम शहर में 30 अन्य स्थानों पर यह नेटवर्क तेज़ी से विस्तारित कर रहे हैं।"

रूबल अग्रवाल, आयएएस, प्रबंध निदेशक, एमएमएमओसीएल ने कहा:

"हमारा विज़न है कि टिकाऊ तकनीक को सार्वजनिक परिवहन से सहज रूप से जोड़ा जाए। होंडा की ई:स्वॅप पहल और हमारी ईव्ही नीति के समर्थन से हम इलेक्ट्रिक वाहन उपयोगकर्ताओं को अधिक स्मार्ट ढांचा उपलब्ध करा रहे हैं, साथ ही महाराष्ट्र के स्वच्छ ऊर्जा और जलवायु लक्ष्यों को भी मजबूती दे रहे हैं।"

होंडा ई:स्वॅप क्या है?

होंडा ई:स्वॅप इलेक्ट्रिक दोपहिया और तिपहिया के लिए अगली पीढ़ी का बैटरी स्वॅपिंग प्लेटफॉर्म है, जो उपयोगकर्ताओं को अपनी खाली बैटरी को होंडा मोबाईल पावर पॅक ई: से दो मिनट से भी कम समय में बदलने की सुविधा देता है। यह सिस्टम लंबा चार्जिंग समय और रेंज की चिंता जैसी प्रमुख समस्याओं का समाधान करता है–जिससे मुंबई जैसे घने शहरी इलाकों में डिलिवरी एजेंटों, रोज़ाना सफर करने वालों और फ्लीट ऑपरेटर्स के लिए ईव्ही अपनाना व्यावहारिक और सुविधाजनक बनता है।

ईवी नीति के तहत, मेट्रो लाइन 2ए और 7 पर ऐसे बैटरी स्वैपिंग सेंटर स्थापित करने की इस पर्यावरण अनुकूल पहल में विभिन्न निजी कंपनियाँ भाग ले सकती हैं।अधिक जानकारी के लिए देखें: www.mmmocl.co.in

Honda e:TECHNOLOGY